सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग,

मंत्रालय, मुंबई

## नागरिकांची सनद

(दि. ४ जुलै, २०२४ पर्यंत सुधारल्याप्रमाणे)

# वित्त विभाग

वित्त विभाग हा महाराष्ट्र शासनाचा एक अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. संविधानाच्या वैधानिक व कामकाजविषयक आवश्यकतेवर आधारीत राज्य शासनाचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व तो विधानमंडळाला सादर करणे, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी लिंग भाव व बाल अर्थसंल्प विवरणपत्र प्रकाशित करणे, भारतीय रिझर्व बँकेकडे शासनाच्या दैनंदिन शिल्लकीवर सूक्ष्म लक्ष ठेवणे, अर्थोपाय स्थिती योग्य राहण्याच्या दृष्टीने आवश्यक व जलद उपाययोजना करणे, राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनेतील जमा व खर्च यांचा आगाऊ अंदाज तयार करणे व राज्याच्या विकासाच्या तसेच जनकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे यासाठी विविध उपाययोजना करणे, वित्त विभाग (खुद्द) व त्या अधिपत्याखालील कार्यालयांशी संबंधित मुळ कामकाज तसेच अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींशी निगडीत धोरणे या संदर्भातील मुळ कामकाज यांसारख्या महत्वाच्या जबाबदाऱ्या वित्त विभागामार्फत पार पाडल्या जातात.

- **महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीनुसार वित्त विभागास खालील विषय नेमून दिलेले आहेत :-**

| अ.क्र | विषय |
|---|---|
| १ | राज्याचा अर्थसंकल्प तयार करणे, अंदाज व अनुदाने, वित्त विधेयके, विनियोजन विधेयके आणि राज्याच्या एकत्रित व आकस्मिक निधी संबंधातील कायदा |
| २ | विनियोजन अहवाल व वित्तलेखे |
| ३ | स्वेच्छाधीन व पंचवार्षिक संविदा अनुदाने |
| ४ | वित्तीय साधने |
| ५ | कराधान - केंद्र व राज्य (स्थानिक स्वराज्य संस्थांनी आकारलेले कर वगळून) |
| ६ | सर्व प्रकारचे कर, करेतर महसूल आणि महसुलाच्या संकीर्ण बाबी यातील वाणिज्यिक महसुलाचे संनियंत्रण |
| ७ | मुंबई ऊस उपकर अधिनियम,१९४८ |
| ८ | वृत्तपत्र जाहिरात कर |
| ९ | केंद्र शासन उत्पादन शुल्क |
| | (अ) विक्रीकर कायदे |
| | (ब) ऊस उपकर/ खरेदी कर |
| | (क) कृषी आयकर |
| | (ड) वित्त अधिनियम |
| १० | राज्य सार्वजनिक प्रतियुतीसंबंधातील सार्वजनिक ऋणाचा समावेश असलेले ऋण, ठेवींची गुंतवणूक |

| | |
|---|---|
| ११ | संघ शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सीमाशुल्क सरहद्दीमधून आयात व निर्यात |
| १२ | भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचितील सूची एकमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या महामंडळाव्यतिरिक्त इतर महामंडळाचे विधीद्वारा संस्थापन, विनियमन व समापन करणे ( तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा) |
| | (अ) राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे व त्यासाठी सुकाणू समिती स्थापन करणे |
| | (ब) शासन निर्णीत वित्त विभागास सोपविलेल्या सार्वजनिक उपक्रमांचे परिसमापन किंवा निर्गुंतवणूक |
| | (क) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, २००० ( सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३) |
| १३ | भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ व मुंबई व्यापारेतर निगम अधिनियम, १९५९ च्या प्रशासन खेरीज व्यापार व वाणिज्य (वित्तीय बाजू) व व्यापारी संघटना ( तसेच विधी व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक ५-अ पहा) |
| १४ | बँक व्यवसाय |
| १५ | राज्याच्या वित्तव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही इतर बाबी. |
| १६ | वेतन, भत्ते, निवृत्तीवेतने, सेवेच्या इतर वित्तीय शर्ती व संवर्ग संख्या ( सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४९ च्या अधीनतेने) |
| १७ | वित्तीय अधिकार प्रदान करणे |
| १८ | वस्तू व सेवाकर विभाग |
| १९ | लेखा व कोषागारे संचालनालय |
| २० | उपायनगार-तोषाखाना |
| २१ | लेखापरीक्षा |
| २२ | महाराष्ट्र वित्त आयोग |
| २३ | भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी योजनेतर खर्चाच्या निधीचे, राज्याची एकूण गरज विचारात घेऊन समन्यायाने वाटप करण्यासंबंधीच्या सर्व बाबी. |
| २४ | अतिरिक्त संवर्ग कक्ष |
| २५ | लिंग भाव अर्थसंकल्प (Gender Budget) व बाल अर्थसंकल्प (Child Budget) |

- **वित्त विभागाची रचना :-**

मा.उप मुख्यमंत्री हे वित्त विभागाचे प्रमुख असून अपर मुख्य सचिव (वित्त) हे प्रशासकीय प्रमुख आहेत. वित्त विभागातील सर्वकष प्रशासकीय नियंत्रण, पर्यवेक्षण व समन्वय यासंबंधीची जबाबदारी अपर मुख्य सचिव (वित्त) यांची आहे. वित्त विभाग (खुद्द) व इतर मंत्रालय विभागांची

व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेची प्रकरणे (राज्याच्या आकस्मिकता निधीतून अग्रिम काढण्याच्या प्रस्तांवासह) आणि मंत्रिमंडळाच्या समितीस सादर करावयाची प्रकरणे अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या मार्फत पुढे सादर करण्यात येतात. अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली सचिव (लेखा व कोषागारे), सचिव (वित्तीय सुधारणा), व प्रधान सचिव (व्यय), या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांमार्फत वित्त विभागाचे कामकाज हाताळण्यात येत आहे.

| अ.क्र. | सचिव | दालन क्रमांक | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (वित्त) | ५ वा मजला (मुख्य) ५०५ | २८३७२२६५ |
| २ | सचिव (लेखा व कोषागारे) | ४ था मजला (मुख्य) ४०३ | २२०२९३३५ |
| ३ | सचिव (वित्तीय सुधारणा) | ५ वा मजला (मुख्य) ५०४ | २२०२३०८५ |
| ४ | प्रधान सचिव (व्यय) | ५ वा मजला (मुख्य) ५०३ | २२०२९७२१ |

- **वित्त विभागाची मुख्य कार्ये :-**

१. शासनाची वित्तीय साधनसंपत्ती संघटित करून तिचा उचित विनियोग करणे,

२. शासनाचे सर्वसाधारण धोरण अंमलात आणण्याकरिता उभारलेल्या सरकारी महसुलाचा विनियोग काटकसरीने केला जात आहे हे पाहणे,

३. आवश्यक निधी उभारण्याची निश्चिती करणे,

४. सर्व वित्तविषयक व्यवहारात शासनाला सल्ला देणे,

५. वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व शासनाच्या सर्व विभागांना निधीचे वाटप करणे,

६. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि इतर नेमून दिलेल्या सेवाविषयक बाबी ठरविणे.

- **वित्त विभागाची जबाबदारी :-**

१. संविधानाच्या वैधानिक व कामकाजविषयक आवश्यकतेवर आधारीत राज्य शासनाचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व तो विधानमंडळाला सादर करणे,

२. राज्य शासनाला केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या कर्जाचे लेखे ठेवणे,

३. योजनातंर्गत व अनिवार्य खर्चामध्ये बचत करण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपाययोजना योजणे,

४. राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कामांचा आढावा घेणे व त्यावर लक्ष ठेवणे,

५. विकासविषयक वर्धनक्षम कार्यक्रमासाठी वित्तीय संस्थांकडून किंवा खुल्या बाजारातील कर्जरोख्याव्दारे उभारलेल्या कर्जाच्या व त्यावरील व्याजाच्या परतफेडीची हमी देण्याबाबत सल्ला देणे,

६. वित्तीय प्रस्तावांची छाननी करणे,

७. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, इतर भत्ते व सेवाशर्ती ठरविणे.

- **वित्त विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग/कार्यालये :-**

१. वस्तू व सेवाकर विभाग

२. लेखा व कोषागारे संचालनालय

३. स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय

४. विमा संचालनालय

५. राज्य लॉटरी संचालनालय.

- **वित्त विभागाचे ध्येय :-**

१. राज्याचे सुयोग्य वित्तीय व्यवस्थापन करणे.

२. आर्थिक विकासासाठी स्थिर व पोषक आर्थिक वातावरण निर्माण करणे.

- **वित्त विभागात हाताळण्यात येणाऱ्या विविध विषयांसंबंधीचे कक्ष :-**

| | |
|---|---|
| १. | अर्थसंकल्प, अर्थोपाय व साधनसंपत्ती |
| २. | ऋण व हमी संनियत्रंण |
| ३. | आकृतीबंध पुर्नरचना |
| ४. | सार्वजनिक उपक्रम |
| ५. | वित्त आयोग |
| ६. | अर्थबळ |
| ७. | व्यय |
| ८. | वित्त विभाग (खुद्द) प्रशासन |
| ९. | लोकलेखा समिती व लेखापरीक्षा |
| १०. | लेखा व कोषागारे |

| | |
|---|---|
| ११. | विनियम |
| १२. | कराधान |
| १३. | शासकीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी. |
| १४. | वस्तू व सेवाकर प्रशासन |
| १५. | फलनिष्पत्ती अर्थसंकल्प |
| १६. | संगणक कक्ष |
| १७. | राज्य लॉटरी संचालनालय |
| १८. | विमा प्रशासन |

वरील नमूद कक्षांमध्ये आवश्यकतेनुसार कार्यासने निर्माण करण्यात आली असून प्रत्येक कार्यासनांना विभागांतर्गत विषय नेमून देण्यात आलेले आहेत. सदर कक्षांच्या कामकाजाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

(१) **अर्थसंकल्प, अर्थोपाय व साधनसंपत्ती कक्ष :-** अर्थसंकल्प कक्षाकडून राज्य शासनाचे वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व ते विधानमंडळास सादर करणे, तसेच पावसाळी, हिवाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पुरवणी विवरणपत्र तयार करून विधानमंडळास सादर करणे ही महत्वाची कामे पार पाडली जातात. अर्थोपाय कार्यासनांकडून भारतीय रिझर्व बँकेकडील शासनाच्या दैनंदिन शिल्लकीवर लक्ष ठेवणे तसेच राज्य शासनाच्या खुल्या बाजारातील कर्जाच्या उभारणीसंबंधीचे कामकाज हाताळण्यात येते. राज्याच्या योजनेचे आकारमान ठरविण्यासाठी उपलब्ध साधनसंपत्ती निर्धारित करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य साधनसंपत्ती कार्यासनाकडून पार पाडले जाते.

(२) **ऋण व हमी संनियंत्रण कक्ष :-** वित्त विभागातील अर्थबळ,अर्थोपाय व पूर्वीचे अर्थसंकल्प ७ या कार्यासनांनी उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीचे (मुद्दल+व्याज यासह) लेखे आणि वसूलीचे मासिक विवरणपत्र अद्ययावत ठेवणे, राज्य शासनाने उभारलेल्या कर्जाचे (मुद्दल+व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे तसेच यासंदर्भातील माहितीचे संकलन करणे, केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कर्जाचे (मुद्दल+व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे, राज्य शासनाने विविध मंत्रालयीन विभागामार्फत दिलेले कर्ज तसेच भागभांडवल गुंतवणूक याबाबतचे (मुद्दल+व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे, घरबांधणी अग्रीमाचा पोर्टफोलिओ विकण्याच्या माध्यमातून निधीची उभारणी (गृहकर्ज अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास पाठविणे.) हमी विषयक नोंदवह्या ठेवणे, मागील वर्षात १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत शासनाने दिलेल्या हमीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र विधानमंडळाला सादर करणे, शासनामार्फत देण्यात आलेल्या सर्व हमी प्रकरणात करार करणे, ऋण देणाऱ्या संस्थेकडून सहामाही अहवाल प्राप्त करुन देणे व त्याची तपासणी करणे, ज्या संस्थेसाठी घेण्यात

आलेली आहे त्याचे लेखे उपलब्ध करुन घेऊन त्यावर संनियंत्रण ठेवणे, शासकीय हमी शुल्कासंदर्भात मागणीपत्र पाठविणे तसेच तदनुषंगाने नोंदवही ठेवणे आणि वसूलीवर देखरेख ठेवणे.

(३) आकृतिबंध पुनर्रचना कक्ष :- राज्याच्या खर्चाच्या तसेच जनकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून प्रशासनावरील अनावश्यक खर्च सिमीत ठेवण्याच्या दृष्टीने विविध काटकसरीच्या उपाययोजना अंमलात आणण्याची कार्यवाही या कक्षाकडून केली जाते.

(४) सार्वजनिक उपक्रम कक्ष :- राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, त्यांचा आढावा घेणे, त्यांच्यावर लक्ष ठेवणे यासाठी एखादी प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याच्या उद्देशाने व या उपक्रमांच्या कार्यांवर लक्ष ठेवून त्यात त्यांची उद्दिष्टे पार पाडण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी राज्य सार्वजनिक उपक्रम केंद्र (State Bureau of Public Enterprises) शासनाने स्थापन केले आहे. मॅफको मर्यादितचे निर्गुंतवणूकीकरण करण्यासाठी मॅफको वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(५) वित्त आयोग कक्ष :- केंद्रीय वित्त आयोगाशीसंबंधीचे कामकाज, राज्य वित्त आयोगासंबंधीचे कामकाज व राजकोषिय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम व नियमाअंतर्गत

३.१) अंमलबजावणी व त्याअंतर्गत विधीमंडळात अर्थसंकल्पीय अधिवेशनात

(अ) मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण

(ब) राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे, वित्तीय विवरणपत्रे प्रकाशित करणे,

३.२) अर्धवार्षिक आढावा सादर करणे,

३.३) सदर अधिनियम व नियमात आवश्यक त्या सुधारणा करणे.

(६) अर्थबळ कक्ष :- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २९३(१) अन्वये महामंडळे, सहकारी संस्था, स्थानिक संस्था इत्यादींनी शासकीय धोरणाच्या अभिवृध्दयर्थ हाती घेतलेले निरनिराळे विकास व उत्पादनविषयक कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्था किंवा खुल्या बाजारातील कर्जरोख्यांव्दारे उभारलेल्या कर्जाच्या व त्यावरील व्याजाच्या परतफेडीकरिता राज्य सरकारमार्फत देण्यात येणाऱ्या हमीबाबतची प्रकरणे विविध विभागांकडून प्राप्त झाल्यास ती अर्थबळ कार्यासनाकडून हाताळली जातात. तसेच खुल्या बाजाराव्यतिरिक्त वित्तीय संस्थांकडून उभारण्यात येणाऱ्या कर्जाच्या समन्वयाचे काम, जागतिक बँक संदर्भातील कामकाज, राज्याच्या सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमांचे तसेच राज्य शासनाच्या अखत्यारीतील इतर संस्थांनी कर्जरोख्यांव्दारे उभारावयाच्या निधीचे कामकाज अर्थबळ कार्यासनामार्फत हाताळले जाते.

(७) <u>व्यय कक्ष</u> :- प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या कक्षेमध्ये येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावांखेरीज इतर सर्व प्रस्तावांची छाननी या कक्षामार्फत केली जाते.

(८) <u>वित्त विभाग (खुद्द) प्रशासन</u> :- या कार्यासनामार्फत वित्त विभाग (खुद्द) तसेच लॉटरी शाखा यांच्या मंत्रालयीन स्तरावरील पदांच्या आस्थापनाविषयक बाबी व गृह व्यवस्थापनांच्या बाबी हाताळल्या जातात.

(९) <u>लोकलेखा समिती व लेखापरीक्षा कक्ष</u> :- लोकलेखा समिती आणि महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होणा-या लेखापरीक्षासंबंधीच्या अनुषंगाने बाबी हाताळल्या जातात.

(१०) <u>लेखा व कोषागारे कक्ष</u> :- या कार्यासनाकडून लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संबंधित आस्थापनाविषयक बाबी तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ - खंड दोन बाबत शासनाच्या धोरणात्मक बाबी हाताळल्या जातात.

(११) <u>विनियम कक्ष</u> :- या कक्षाकडून

(अ) मुंबई वित्तीय नियम, १९५९;

(ब) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ व

(क) वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ या संबंधीचे कामकाज पाहिले जाते. तसेच शासकीय कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापरासंबंधीचे धोरण विषयक बाबी यासंबंधीचे कामकाज पाहिले जाते.

(१२) <u>कराधान कक्ष</u> :- या कक्षाकडून

(अ) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२;

(ब) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६;

(क) महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२;

(ड) महाराष्ट्र व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५;

(इ) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रातील मोटार वाहनावरील प्रवेशकर (पेट्रोलियम प्रॉडक्टस), २००२;

(फ) महाराष्ट्र ऐषआराम कर अधिनियम, १९८७ व

(ग) चिटफंड कर अधिनियम, १९८२ तसेच वस्तू व सेवाकर विभागाशी संबंधित कर विषयीची सर्व न्यायालयीन प्रकरणे यासंबंधीच्या राज्य शासनाचे धोरण विषयक व प्रशासनाशी निगडीत असलेल्या बाबी हाताळल्या जातात.

(१३) <u>सेवा कक्ष</u> :- या कक्षात शासकीय कर्मचाऱ्यांच्या निम्न नमूद सेवा नियमासंबंधीचे कामकाज हाताळले जाते.

(अ) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम,१९८१.
(ब) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१.
(क) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,१९८१.
(ड) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१.
(इ) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम,१९८२.
(फ) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम,१९८४.
(ग) राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली.

तसेच नवीन अंशदायी निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली, प्रवासभत्ता, घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, वाढलेल्या जीवनमानासाठी स्थानिक पूरक भत्ता, मानधन व फी इत्यादी बाबीदेखील हाताळण्यात येतात.

(१४) <u>वस्तू व सेवाकर प्रशासन कक्ष :-</u> या कक्षाकडून वस्तू व सेवाकर विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणावरील अध्यक्ष व सदस्य यांच्या आस्थापनाविषयक बाबी तसेच गृह व्यवस्थापन व अर्थसंकल्प विषयक बाबी हाताळल्या जातात.

(१५) <u>फलनिष्पत्ती अर्थसंकल्प कक्ष</u> :- या कार्यासनाकडून सन २०२०-२१ पासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी लिंग भाव व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र प्रकाशित करण्यात येत आहे. महिला सक्षमीकरण आणि बालक विकास व तृतियपंथी लोकांचे कल्याण  व त्यांच्या गरजांचा समावेश शासकीय धोरणे, उपक्रम आणि सहभाग यामध्ये होणे व त्यांच्या गरजांचे प्राधान्यक्रम ठरविणे हा उद्देश आहे.

(१६) <u>संगणक कक्ष :</u>- राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या मदतीने वित्त विभाग व अधिनस्त कार्यालयांसाठी finance.mah.nic.in ही वेबसाईट तयार केलेली आहे. या वेबसाईटवर वित्त विभाग (खुद्द), वस्तू व सेवाकर विभाग, लेखा व कोषागारे संचालनालय, लॉटरी संचालनालय व विमा संचालनालय इत्यादी कार्यालयांच्या महत्वाच्या योजनांची माहिती ठेवण्यात आली आहे. या माहितीस अनुसरुन या विभागाकडे येणाऱ्या ई-मेलना संबंधित कार्यालयामार्फत/कार्यासनामार्फत उत्तरे देण्याचे काम करण्यात येते. त्याशिवाय विभागाने निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रके, प्रकाशने ही www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते.

(१७) <u>राज्य लॉटरी प्रशासन</u> :- या कार्यासनामार्फत राज्य लॉटरी आयुक्तालय यांच्या राज्य स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या आस्थापना विषयक व अर्थसंकल्प विषयक बाबी हाताळल्या जातात.

(१८) **विमा प्रशासन** :- या कार्यासनामार्फत विमा संचालनालयाच्या आस्थापना विषयक बाबी हाताळल्या जातात. तसेच राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना आणि राज्य शासकीय कर्मचारी अपघात विमा योजनाशी संबंधित बाबी हाताळण्यात येतात.

- **वित्त विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा :-**

**वित्त विभागामार्फत नागरिकांना कोणतीही थेट सेवा पुरविली जात नाही.**

तथापि, वित्तीय तसेच सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांमार्फत नस्ती/संदर्भ वित्त विभागाकडे पाठविल्यास मान्यता/अभिप्राय देण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत केली जाते. याकरिता विषयनिहाय कार्यासनांची निर्मिती करण्यात आली असून प्रत्येक कार्यासनाकडे नेमून दिलेल्या विषयांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्रशासन -१ | ३रा मजला ३३० (विस्तार ) | वित्त विभाग (खुद्द) च्या आस्थापना विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२८२६८११ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| २ | प्रशासन-२ | ३रा मजला ३३० (विस्तार) | वित्त विभाग ( र. व का.), अग्रिमे, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती, गोपनीय अहवालांचे संकलन/ संस्करण विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२८२६८११ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ३ | प्रशासन -३ (नोंदणी शाखा) | ३ रा मजला ३२४ -अे (विस्तार इमारत) | नोंदणी शाखेत प्राप्त टपालाची आवक-जावक नोंद व अनुषंगिक बाबी. तसेच माहितीच्या अधिकारा खालील सर्व अर्जांची नोंद. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९३३१९ | सह सचिव दूरध्वनी क्र.२२०२६३९० |
| ४ | प्रशासन -४ | ३रा मजला ३२२ (विस्तार इमारत) | - वित्त विभाग (खुद्द) आणि विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या अर्थसंकल्पविषयक बाबी.<br>- राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत आयोजित प्रशक्षिणाकरीता अर्थसंकल्पीय तरतूद तसेच निधीचे वाटप, खर्चमेळाचे काम, आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे समन्वय. | अवर सचिव दूरध्वनी क्र.२२८३९८५९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२६३९० |
| ५ | प्रशासन -५ | ३ रा मजला ३५७ (विस्तार इमारत) | वित्त विभाग गृह व्यवस्थापन विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१५ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६३ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | रोखशाखा | ३रा मजला ३२४ (विस्तार इमारत) | वित्त विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक बाबी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९३३१९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२६३९० |
| ७ | संगणक कक्ष | ३रा मजला ३३३ (विस्तार इमारत) | - वित्त विभागातील संगणक विषयक बाबी.<br>- तसेच प्रकल्प अंमलबजावणी समितीशी निगडित कामकाज. | कक्ष अधिकारी, दूरध्वनी क्र. २२७९३०८१ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२७९४२७९ |
| ८ | कोषा प्रशा-१ | ३ रा मजला ३४२ (विस्तार इमारत) | महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारी/ विभागीय चौकशी/ स्वेच्छा सेवानिवृत्ती विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३९०५/ २२७९४२८३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८३६६०१ |
| ९ | कोषा प्रशा-२ | ३ रा मजला ३४२ (विस्तार इमारत) | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सर्व आस्थापनाविषयक बाबी, निवड सूची / जेष्ठता सूची, गोपनीय अहवाल विषयक बाबी, आगाऊ वेतनवाढी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३९०५ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८३६६०१ |
| १० | कोषा प्रशा-३ | ३रा मजला ३४२ (विस्तार इमारत) | - लेखा व कोषागारे तसेच स्थानिक निधी लेखा संचालनालयाच्या आस्थापने वरील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक बाबी.<br>- तसेच अधिकारी/ कर्मचारी यांच्या विमान प्रवासास मंजूरी/ वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती/ प्रशिक्षणाच्या बाबींना प्रशासकीय मंजूरी देणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२७९३९०५ /२२७९४२८३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८३६६०१ |
| ११ | कोषा प्रशा-४ | ३ रा मजला ३३७ (विस्तार इमारत) | लेखा व कोषागारे संचालनालय व स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालयाच्या खर्चाच्या बाबींना प्रशासकीय मंजूरी देणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४२८३ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४४२२२ |
| १२ | कोषा प्रशा-५ | ३ रा मजला ३३९ (विस्तार इमारत) | महाराष्ट्र कोषागार नियम, सुलभीकरण व सुधारणा विषयक बाबी, आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यास मान्यता देणे, स्वीय प्रपंजी लेखा खाते उघडण्यास मान्यता देणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४३०१ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४४२२२ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| १३ | राज्यकर प्रशा-१ | ३रा मजला नवीन प्रशासकीय इमारत | गट-अ मधील सर्व अधिकारी (सहायक राज्यकर आयुक्त वगळून), तसेच गट क, गट-ड कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३३६/ २२७९३८११ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८२१७९७ |
| १४ | राज्यकर प्रशा-२ | ३ रा मजला नवीन प्रशासकीय इमारत | सहायक राज्यकर आयुक्त (गट-अ) व गट-ब मधील राजपत्रित /अराजपत्रित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३३६/ २२७९३८११ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८२१७९७ |
| १५ | राज्यकर प्रशा-३ | ३रा मजला नवीन प्रशासकीय इमारत | वस्तू व सेवाकर विभागातील अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालावरील संस्करण, जेष्ठतासूच्या, निवडसूच्या तयार करणे व वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३३६/ २२७९३०८६ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८२१७९७ |
| १६ | राज्यकर प्रशा-४ | ३रा मजला नवीन प्रशासकीय इमारत | - वस्तू व सेवाकर विभागाची गृह व्यवस्था, हंगामी पदांना मुदतवाढ, प्रशिक्षण, प्रशासकीय मान्यतेच्या बाबी इत्यादी.<br>- वस्तू व सेवा कर विभागासंबंधी बांधकाम विषयक अर्थसंकल्पीय बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३३६/ २२७९३०८६ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८२१७९७ |
| १७ | सार्वजनिक उपक्रम | ३ रा मजला ३२० (विस्तार) | सार्वजनिक उपक्रमांचे व्यवस्थापन विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२८३९८५९ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२६३९० |
| १८ | विमा प्रशासन | ३ रा मजला ३३९ (विस्तार इमारत) | विमा संचालनालयाच्या आस्थापना विषयक बाबी. तसेच विमा जोखीम संबंधित तांत्रिक बाबी / राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना / गट विमा योजनेचे प्रशासन तसेच राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेचे प्रशासन, योजनेसंबंधी तक्रार निवारण व सल्ला देणे तसेच योजनेत फेरफार करणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४३०१/ २२८२९३६८ | सहसचिव दूरध्वनी क्र. २८५१३६३ |
| १९ | सेवा-३ | ३ रा मजला ३३५ (विस्तार इमारत) | वेतननिश्चितीविषयक बाबी, कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७४ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२७८९८ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| २० | सेवा-४ | ३ रा मजला ३३५ (विस्तार इमारत) | निवृत्तीवेतनविषयक धोरणात्मक बाबी. शालेय शिक्षण तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाची शिक्षकांची निवृत्तीवेतन विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७३ | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३७४ |
| २१ | सेवा-५ | ३ रा मजला ३३५ (विस्तार इमारत) | प्रवासभत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते आणि वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४२८३ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२७८९८ |
| २२ | सेवा-६ | ३ रा मजला ३३५ (विस्तार इमारत) | महाराष्ट्र नागरी सेवा नियम सुलभीकरण, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजाविषयक बाबी, बोनस, निलंबन, प्रतिनियुक्ती विषयक बाबी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९३०७४ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२७८९८ |
| २३ | सेवा-७ | ३ रा मजला ३३५ (विस्तार इमारत) | मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची निवृत्तीवेतनविषयक अनौपचारिक प्रकरणे, वेतन पडताळणी पथके. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७७/ २२८१०१७२ | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३७४ |
| २४ | सेवा-९ | ७ वा मजला (विस्तार इमारत) | वेतन आयोग व वेतन त्रुटी विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३४२४ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२७८९८ |
| २५ | लोलेस | ५ वा मजला मुख्य | - लोकलेखा/ अंदाज / सार्वजनिक उपक्रम समितीच्या बैठका व त्यांच्या अहवालावर/ शिफारशींवर कार्यवाही / समन्वय.<br>- सर्व मंत्रालयीन विभागांशी संबंधित लेखा परीक्षा आक्षेप, हरकती, प्रारुप परिच्छेद तपासणीविषयक बाबी. विभागीय लेख्यांशीं मेळ घालण्यासाठी धोरणात्मक बाबी.<br>- पंचायतराज समितीच्या कामकाजाचे समन्वय. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९४२७९३८१२/ २२७९३८१० | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४४२२२ |
| २६ | विनियम | ३ रा मजला ३३१ (विस्तार) | मुंबई वित्तीय नियम विषयक बाबी, वाहनांचा आढावा. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७३ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४४२२२ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| २७ | व्यय-१ | ६वा मजला (पूर्व) रु.नं.६५० | - कृषि व पदुम विभाग (कृषि, फलोत्पादन) ;<br>- अल्पसंख्यांक विकास विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२७९३८१४ | सह सचिव दूरध्वनी क्र.२२०२४८४७ |
| २८ | व्यय-२ | ६वा मजला (पूर्व) | - सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,<br>- पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाशी संबधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२४८४७ |
| २९ | व्यय-३ | ५वा मजला (पूर्व) | - गृह निर्माण विभाग,<br>- नगर विकास विभाग,<br>- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७१ | सह सचिव दूरध्वनी क्र.२२०२४८४७ |
| ३० | व्यय-४ | ६वा मजला (पूर्व) दालन क्र.६५० | - महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,<br>- सामान्य प्रशासन विभाग,<br>- संसदीय कार्य विभाग,<br>- मराठी भाषा विभाग,<br>- महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांची व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१० | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८१४४१८ |
| ३१ | व्यय-५ | ५वा मजला (पूर्व) | - शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>- उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि<br>- विधी व न्याय विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९३०७१ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८१४४१८ |
| ३२ | व्यय-६ | ३ रा मजला ३३३ (विस्तार इमारत) | - महिला व बाल विकास विभाग,<br>- कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३२०२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६६ |
| ३३ | व्यय-७ | ५वा मजला (मुख्य इमारत) | - गृह विभागाशी (कायदा व सुव्यवस्था) संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- वित्त विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३२०२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६३ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३४ | व्यय-८ | ५वा मजला (मुख्य इमारत) | - गृह विभाग (कायदा व सुव्यवस्था वगळून) इतर आस्थापनेशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- नियोजन विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- रोजगार हमी योजना आस्थापनेशी संबंधित व्यय बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३२०२ | सहसचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६३ |
| ३५ | व्यय-९ | ६वा मजला (पूर्व) | - महसूल व वन विभाग (महसूल) उपविभाग व्यय विषयक बाबी.<br>- महसूल व वन विभाग (खुद्द) मधील व्यय विषयक बाबी.<br>- महसूली आस्थापनेशी संबंधित व्यय विषयक बाबी.<br>- जमिन वितरण व मुल्यांकन (निर्वासित वसाहतींसह)<br>- भूसंपादन धोरण व निवाडे<br>- नैसर्गिक आपत्ती (पाणी पुरवठा वगळून )<br>- करमणूक कर<br>- गावठाण विस्तार योजना विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४०८१ | सह सचिव दूरध्वनी क्र.२२८५१३६३ |
| ३६ | व्यय-१० | ६वा मजला (पूर्व) दालन क्र.६५० | - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- महसूल व वन विभाग (वन विभाग),<br>- मुद्रांक व नोंदणी विभाग,<br>- पुनर्वसन विभाग,<br>- संपूर्ण पुनर्वसन आस्थापना (भूसंपादन व निवाडे वगळून),<br>- (निष्कासित वसाहतीमधील प्रकरणे वगळून),<br>- भूमी अभिलेख विभाग,<br>- वन विकास कर,<br>- पुनर्वसन उत्पादन केंद्र,<br>- सामाजिक वनीकरण संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४०८१ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६३ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३७ | व्यय-११ | ५वा मजला (पूर्व) | सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७१ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२६३९० |
| ३८ | व्यय-१२ | ६ वा मजला (पूर्व) | जलसंपदा विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२६३९० |
| ३९ | व्यय-१३ | ६वा मजला (पूर्व) | - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६६ |
| ४० | व्यय-१४. | ३ रा मजला ३३१ (विस्तार) | - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- आदिवासी विकास विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४०८३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८३८२ |
| ४१ | व्यय-१५ | ६ वा मजला (पूर्व) | - ग्रामविकास विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- मृद व जलसंधारण विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी,<br>- सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३८१२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२८५१३६६ |
| ४२ | व्यय-१६ | ५ वा मजला (पूर्व) | - उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,<br>- पर्यावरण विभागाशी संबंधित व्यय विषयक बाबी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९३०७१ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२८३८२ |
| ४३ | अर्थसंकल्प-१ | ५वा मजला (मुख्य इमारत) | - वित्त विषयक विवरणपत्र,<br>- कार्यक्रम अंदाजपत्रकांसंबंधी सर्वसाधारण बाबी,<br>- नियोजन व वित्त आयोगास द्यावयाचे पूर्वानुमान,<br>- अर्थसंकल्पाच्या समन्वय विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२७९३३९३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४४ | अर्थसंकल्प-२ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - लोकलेखा समिती, अंदाज समिती संबंधीची कामे (अर्थसंकल्प शाखा विषयक),<br>- व्यय अग्रक्रम समितीची कामे,<br>- योजनांतर्गत अंदाजांचे एकत्रीकरण,<br>- लोकलेखा अर्थसंकल्प,<br>- लेखांकन पध्दतीच्या सर्वसाधारण बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३४८ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ४५ | अर्थसंकल्प-३ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - आकस्मिकता निधी विषयक बाबी,<br>- अर्थसंकल्प विषयक वैधानिक बाबी,<br>- अर्थसंकल्पीय प्रकाशनांची छपाई,<br>- नवीन बाबींचे प्रस्ताव,<br>- अधिक खर्चाच्या मागण्या इ. विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२७९३०८० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ४६ | अर्थसंकल्प-४ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - अर्थसंकल्प वितरण व संनियंत्रण (BDS),<br>- नॉन ट्रेझरी अकाऊंटस् एन्ट्री,<br>- संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली,<br>- अर्थसंकल्पाशी निगडीत महालेखापाल कार्यालयाशी करावयाचा पत्रव्यवहार इ. विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ४७ | अर्थसंकल्प-५ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | इतर मागास बहुजन कल्याण विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २०२८८७६ |
| ४८ | अर्थसंकल्प-६ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | महसूल व वन विभागाशी संबंधित अर्थसंकल्पविषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ४९ | अर्थसंकल्प-७ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,<br>- दिव्यांग कल्याण विभाग,<br>- पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि<br>- महिला व बालविकास विभागाशी संबंधीत अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५० | अर्थसंकल्प- ८ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>- उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३९३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५१ | अर्थसंकल्प-९ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>- वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३५० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५२ | अर्थसंकल्प-१० | ५ वा मजला (मुख्य इमारत) | जलसंपदा विभागाशी संबंधित अर्थसंकल्पविषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०८० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५३ | अर्थसंकल्प-११ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - गृह विभाग,<br>- विधि व न्याय विभाग,<br>- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३४३३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५४ | अर्थसंकल्प-१२ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३४४२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५५ | अर्थसंकल्प-१३ | ५ वा मजला (मुख्य इमारत) | - कृषि विभाग,<br>- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३५० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५६ | अर्थसंकल्प-१४ | ५ वा मजला मुख्य इमारत | - सामान्य प्रशासन विभाग,<br>- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,<br>- अल्पसंख्याक विकास विभाग व<br>- मराठी भाषा विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३४३३ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५७ | अर्थसंकल्प-१५ | ५ वा मजला मुख्य इमारत | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३३५० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ५८ | अर्थसंकल्प-१६ | ५ वा मजला मुख्य इमारत | - नगर विकास विभाग,<br>- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,<br>- नियोजन विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५९ | अर्थसंकल्प-१७ | ५ वा मजला मुख्य इमारत | - ग्रामविकास विभाग,<br>- मृद व जलसंधारण विभाग,<br>- गृहनिर्माण विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३४४२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ६० | अर्थसंकल्प-१८ | ५ वा मजला मुख्य इमारत | - महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,<br>- वित्त विभाग,<br>- संसदीय कार्य विभाग,<br>- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,<br>- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३६८९ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ६१ | अर्थसंकल्प-१९ | ५ वा मजला मुख्य इमारत | आदिवासी विकास विभागाशी संबंधित अर्थसंकल्प विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०८० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८८७६ |
| ६२ | अर्थोपाय | ५ वा मजला (मुख्य इमारत | अर्थोपाय उपाययोजना, खुल्या बाजारातून कर्ज उभारणे इ. विषयक बाबी. | कक्ष अधिकारी दुरध्वनी क्र. २२७९४२८७ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२८४०९१११ |
| ६३ | अर्थबळ | ५ वा मजला (मुख्य)इमारत | कर्ज व कर्जरोखे यामार्फत कर्ज उभारणी संदर्भातील धोरणात्मक बाबी. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४२८७ | उप सचिव दूरध्वनी क्र. २८४०९१११ |
| ६४ | ऋण व हमी संनियंत्रण कक्ष | ५ वा मजला मुख्य)इमारत | अर्थबळ, अर्थोपाय या कार्यासंनामार्फत उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीचे विवरणपत्र अद्ययावत ठेवणे, केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कर्जाचे तसेच राज्य शासनाने दिलेल्या कर्जाचे अद्ययावत लेखे ठेवणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४२८७ | उप सचिव दूरध्वनी क्र. २८४०९१११ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६५ | साधनसंपत्ती | ५ वा मजला (मुख्य) | राज्याची पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना यासाठी वित्तिय साधनसंपत्तीचे अंदाज | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०८५ | उप सचिव दूरध्वनी क्र. २८४०९१११ |
| ६६ | वित्त आयोग कक्ष | ५ वा मजला (मुख्य) | १) केंद्रीय वित्त आयोगासंबंधीचे कामकाज,<br>२) राज्य वित्त आयोगासंबंधित कामकाज<br>३) राजकोषिय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम व नियमाअंतर्गत :<br>३.१) अंमलबजावणी व त्याअंतर्गत विधीमंडळात अर्थसंकल्पीय अधिवेशनात<br>- मध्यम मुदतीचे राजकोषिय धोरण,<br>- राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे वित्तीय विवरणपत्रे प्रकाशित करणे;<br>३.२) अर्धवार्षिक आढावा सादर करणे,<br>३.३) सदर अधिनियम व नियमात आवश्यक त्या सुधारणा करणे. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२८२८९९२ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४०९११ |
| ६७ | फलनिष्पत्ती अर्थसंकल्प | ५ वा मजला (मुख्य इमारत) | लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) याबाबतची माहिती | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२७९४२८२ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२८४०९११ |
| ६८ | कराधान-१ | ५ वा मजला (मुख्य) | मूल्यवर्धित कर तसेच वस्तू व सेवाकर अधिनियमात सुधारणा. | रिक्त दुरध्वनी क्र.२२७९४०८२ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३३६ |
| ६९ | कराधान-२ | ५ वा मजला (मुख्य) | वस्तू व सेवाकर विभागाचे संगणकीकरण, वस्तू व सेवाकरातून सूट/माफी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९४०८२ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३३६ |

| अ. क्र. | कार्यासनाचे नाव | दालन क्रमांक | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७० | कराधान-३ | ५ वा मजला (मुख्य) | - व्यवसाय कर कायदा, १९७५<br>- ऊस खरेदी कर कायदा, १९६२<br>- चिटफंड कायदा, १९८२ इ. कायद्यांशी संबंधित बाबी,<br>- राज्यकर विभागाकडील न्यायालयीन बाबी,<br>- राज्यकर विभागाशी संबंधित कायद्यांखालील लेखापरिक्षा परिच्छेद,<br>- महसुली जमा अहवाल, लोकलेखा समिती संबंधित कामकाज. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९४०८२ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३३६ |
| ७१ | समन्वय | ५ वा मजला मुख्य इमारत | विधानमंडळ विषयक कामकाज आणि समन्वय विषयक बाबी. | अवर सचिव दूरध्वनी क्र. २२७९४०८२ | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२८३८२ |
| ७२ | आकृतिबंध पुनर्रचना कक्ष | ३ रा मजला ३३७ (विस्तार) | अतिरिक्त संवर्ग आणि काटकसरीची उपाययोजना, वित्तीय सुधारणाविषयक अन्य बाबींवरील कार्यवाही. | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२७९३०७७ | उप सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३७४ |
| ७३ | लॉटरी शाखा | ८ वा मजला नवीन प्रशासन भवन. | राज्य लॉटरी आस्थापनाविषयक कामकाज | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र. २२०२७४५३ २२०२५४७० | सह सचिव दूरध्वनी क्र. २२०२५३७४ |

<u>वित्त विभागाची(खुद्द) मागील तीन वर्षांची अंदाजपत्रकीय तरतूद व झालेला खर्च आणि अधिक खर्चाबाबतची माहिती :-</u>

(रुपये हजारात)

| वर्ष | | वेतन | वेतनेतर बाबी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१९-२०२० | मूळ तरतूद | ३७७२७४ | ६७२०५ | ४४४४७९ |
| | पुरवणी मागणी | ०० | ०० | ०० |
| | एकूण तरतूद | ३७७२७४ | ६७२०५ | ४४४४७९ |
| | झालेला खर्च | ३१०८८८ | ३८८१७ | ३४९७०५ |
| २०२०-२०२१ | मूळ तरतूद | ३७७०४६ | ४८६०० | ४२५६४६ |
| | पुरवणी मागणी | १ | १०००१ | १०००२ |
| | एकूण तरतूद | ३७७०४७ | ५८६०१ | ४३५६४८ |
| | झालेला खर्च | २८९३०७ | ४९०८८ | ३३८३९५ |
| २०२१-२०२२ | मूळ तरतूद | ३७४३८८ | ६४३०० | ४३८६८८ |
| | पुरवणी मागणी | ०० | ०० | ०० |
| | एकूण तरतूद | ३७४३८८ | ६४३०० | ४३८६८८ |
| | झालेला खर्च | ३२४७१९ | ४५५०५ | ३७०२२४ |
| | | | | |

**<u>वित्त विभागाकडे अन्य प्रशासकीय विभागाकडून प्रकरणे / संदर्भ पाठविताना पुढीलप्रमाणे तपशीलवार माहिती पाठविणे आवश्यक राहील.</u>**

१) बाब / योजना / कार्यक्रमाचे / प्रस्तावाचे संक्षिप्त वर्णन.
२) मूळ योजना/ कार्यक्रम / अनिवार्य खर्चाच्या बाबीस विहित पद्धतीने सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेतली असल्याचा उल्लेख.
३) कार्यक्रमाचे / अनिवार्य खर्चाचे स्वरुप, उदा. अनिवार्य / कार्यक्रम, राज्य योजना / केंद्र योजना/ केंद्र पुरस्कृत योजना.
४) अनिवार्य खर्च / कार्यक्रमावरील खर्चाचे तपशीलवार लेखाशिर्ष.
५) अनिवार्य खर्च / कार्यक्रम खर्चावरील आवर्ती / अनावर्ती / वार्षिक खर्चाचा तपशील.
६) अनिवार्य खर्च / कार्यक्रम खर्चासाठी शासकीय निधी/अनुदान आवश्यक असल्यास शासन मान्यता घेतल्याची कागदपत्रे.
७) अनिवार्य खर्च / कार्यक्रम खर्चासाठी शासकीय निधी व्यतिरिक्त अन्य मार्गाने आर्थिक सहाय्य प्राप्त होणार असल्यास त्याचा तपशील.
८) नेमक्या कोणत्या विशिष्ट बाबीवर वित्त विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत, ते स्पष्टपणे नमूद करावे.

<u>वित्त विभागातर्फे कार्यवाही पूर्ण करण्यास लागणारा कालावधी</u>

१) विभागात प्राप्त होणाऱ्या अनौपचारिक संदर्भावर जास्तीत जास्त तीन आठवड्यात कार्यवाही केली जाईल.
२) विभागात जनतेकडून प्राप्त होणाऱ्या औपचारिक संदर्भास कमाल एक आठवड्यात पोच दिली जाईल.
३) विभागात प्राप्त होणाऱ्या निवेदनांवर कमाल ४५ दिवसांचे आत कार्यवाही केली जाईल.

********************************

वित्त विभाग /प्रशासन-२

पुर्व पृष्ठावरील टिप्पणीस अनुसरुन सादर.

२.पृ. /प ते पृ. /प वरील वित्त विभाग (खुद्द)ची नागरीकांची सन (दि. एप्रिल, २०२० पर्यंत सुधारीत) प्रसिध्द करण्यास हरकत नसावी.

तात्काळ

क्र. विविआ-२०१९/प्र.क्र.१९४/प्रशा-२,
वित्त विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ एप्रिल, २०२१

प्रति,

सर्व सह सचिव /उप सचिव,
वित्त विभाग ,मंत्रालय ,-
मुंबई ४०० ०३२.

विषय : वित्त विभाग (खुद्द) ची नागरिकांची सनद
अद्यावत करुन प्रसिद्ध करण्याबाबत.

महोदय,

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम, २०१३ च्या नियम ८(१) मधील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी २ मे रोजी नागरिकांच्या सनदेमध्ये सुधारणा करुन ती प्रसिध्द

करणे आवश्यक आहे. यास्तव, वित्त विभाग (खुद्द) ची दि.०७.०४.२०२१ पर्यंत अद्ययावत केलेली नागरीकांची सनद विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. या अद्यावत केलेल्या नागरिकांच्या सनदेमध्ये आपल्या अधीनस्त कार्यासनांशी सबंधित माहितीमध्ये काही सुधारणा करणे किंवा भर घालणे आवश्यक असल्यास तसेच माहिती निरंक असल्यास तसेही प्रशासन-२ या कार्यासनास कळविण्यात यावे, हि विनंती.

आपली,

( रेखा काळसेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

निवडनस्ती/प्रशासन-२